महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई- ४०० ००१,
दूरध्वनी क्र.०२२- २२६२०२३१/३२, Email : higherartexam@gmail.com

क्रमांक : डिओऐ/एचएई-२०२०/चार/३९४ दिनांक:०१/१०/२०२०

प्रति,
प्राचार्य,
शासनमान्य अशासकीय कला महाविद्यालये.

विषय :- शासकीय उच्चकला परीक्षा २०२०
अंतिम वर्ष पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, कला संचालनालयामार्फत घेण्यात येणा-या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या परीक्षा २०२० आयोजनाबाबतच्या वेळापत्रक व मार्गदर्शक सूचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालय व शासनाच्या आदेशानूसार अंतिम वर्षाच्या परीक्षा माहे, ऑक्टोबर २०२० मध्ये आयोजित करुन निकाल जाहीर करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास्तव वेळापत्रकानूसार परीक्षेचे आयोजन करणे व तंद्नुषंगीक कामकाज हाताळणे प्राचार्य म्हणून आपली जबाबदारी आहे. सदर परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याबाबत आपण काळजी घ्यावी.

परीक्षा आयोजनाबाबत आवश्यकता असल्यास स्थानिक प्रशासनाची मदत घेण्याबाबतही वेळापत्रकासोबतच्या मार्गदर्शक सूचनामध्ये नमूद केले आहे. तरी, वेळापत्रक व मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन परीक्षा आयोजनाबाबत सहकार्य करावे.

(आ. म. वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) मा. उपसचिव (कला), महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई.
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
४) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
५) निरिक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) सहायक निरिक्षक, विभागीय कार्यालय, चित्रकला व शिल्प, नागपूर.
७) सहायक निरिक्षक, विभागीय कार्यालय, चित्रकला व शिल्प, औरंगाबाद.
८) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक दोन.
९) निवड नस्ती.

Scanned by TapScanner